# भारतातील ई-प्रशासना समोरील आव्हाने एक चिकित्सक अभ्यास

**प्रा. प्रवीण कारभारी शिंदे**
गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला
भगवंतराव वाजे वाणिज्य आणि विज्ञान
महाविद्यालय सिन्नर

**प्रस्तावना :**

आधुनिक काळ विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा काळ म्हणून ओळखला जातो एकविसाव्या शतक हे माहिती तंत्रज्ञानाचे शतक मानले जाते. विज्ञान व तंत्रज्ञानाचा प्रसार व प्रचार यामुळे जगात अनेक क्षेत्रात क्रांतिकारक बदल झालेले आहेत. प्रत्येक राष्ट्र सर्वांगीण विकासासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करीत आहे. विज्ञानातील संशोधनामुळे औद्योगिक क्रांती घडून आली औद्योगिक क्रांतीमुळे आर्थिक विकास घडून आला. माहिती तंत्रज्ञानामुळे मानवी जीवनाच्या सर्वच क्षेत्रावर परिणाम झाला आज जगातील सर्व देशातील शासन यंत्रणा व प्रशासकीय व्यवस्थेवर तंत्रज्ञानाचा परिणाम होऊन शासन व प्रशासन यंत्रणेत मूलभूत बदल झालेले दिसतात आधुनिक समाजाच्या आवश्यकता अपेक्षा पूर्ण करण्यात पारंपारिक प्रशासकीय व्यवस्था म्हणावी तेवढी यशस्वी झाली नाही. प्रशासकीय कार्यातील वाढ, कार्याचे गुंतागुंतीचे स्वरूप, नोकरशाही प्रवृत्ती, जनतेप्रती असलेली उदासीन भूमिका व अकार्यक्षमता, अपारदर्शकता लालफीत शाही, भ्रष्टाचार इत्यादीमुळे प्रशासकीय व्यवस्था बेजबाबदार व अकार्यक्षम बनली म्हणून हे दोष दूर करून प्रशासनाला अधिक जनताभिमुख व उद्दिष्टभिमुख बनविण्याच्या दृष्टीने प्रशासनात आधुनिक इलेक्ट्रॉनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. त्यालाच ई-प्रशासन असे म्हणतात आधुनिक काळात ग्रामपंचायत कार्यालयापासून चे पंतप्रधान कार्यालय, युनोच्या सचिवालय पर्यंत संगणक व माहिती तंत्रज्ञानाचा अवलंब केला जात आहे. शाळा, महाविद्यालय, बँका, वित्तीय संस्था, रेल्वे, परिवहन महसूल सर्व क्षेत्रात प्रशासनाला नवीन स्वरूप प्राप्त झालेले आहेत.

**अभ्यासाचे उद्देश:**

1) ई- प्रशासनाचे महत्त्व समजून घेणे.
2) ई प्रशासनात येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे.
3) ई-प्रशासन समोरील आव्हाने यांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती:**

ई-प्रशासन या विषयाच्या संदर्भात संशोधन करताना ऐतिहासिक संशोधन पद्धतीच्या दृष्टिकोनातून आढावा घेण्यात आला. त्यासाठी वेगवेगळ्या पुस्तकांमधून जर्नल मधून

उपलब्ध माहितीच्या आधारे विषयाचे संशोधन केले जाईल.

**ई-प्रशासन अर्थ**

ई-प्रशासनाचा अर्थ इलेक्ट्रॉनिक असा आहे ज्या प्रशासनात इलेक्ट्रॉनिक साधनाच्या सहाय्याने कार्य केले जातात. त्या प्रशासनाला ई-प्रशासन असे म्हणतात ई-प्रशासन हे कधीही आणि कुठेही उपलब्ध असते. ई- प्रशासन हेच सक्षम सर्वश्रेष्ठ व प्रभावी प्रशासन असते.

देवांग मेहता म्हणतात प्रशासनाचा संबंध स्मार्ट प्रशासनाशी आहे. (SMART) म्हणजे

S- Simple- साधे व सुलभ प्रशासन

M- Moral - नैतिक प्रशासन

Accountable-उत्तरदायी प्रशासन

R-Resonsible-जबाबदार प्रशासन

T-Transperent -पारदर्शक प्रशासन

माहिती तंत्रज्ञानाद्वारे संचालित केलेले प्रशासन स्मार्ट प्रशासन होण्यास मदत होते. प्रशासनाला लाईव्ह प्रशासन असे म्हणतात. ई-प्रशासनाचे स्वरूप अतिशय महत्त्वपूर्ण आहे. ई-प्रशासन थेट, जलद व भ्रष्टाचारविरहित निर्णय घेऊ शकते. याचा जनतेला प्रत्यक्ष लाभ होतो. ई-प्रशासनाद्वारे जनतेला शासन व प्रशासनाच्या कार्यासंबंधी माहिती व सेवा ऑनलाइन मिळत असल्यामुळे वेळ, श्रम व पैशाची बचत होते. विमान व रेल्वे आसनांचे ऑनलाइन आरक्षण, संगणीकृत सातबारा, एटीएम, ई- तिकीट इत्यादी ई- प्रशासनाची उत्कृष्ट उदाहरणे सांगता येतील.

**ई प्रशासनाची वैशिष्ट्ये:**

**1) कागद विरहित प्रशासन-**

कागद विरहित कामकाज हे ई-प्रशासनाचे ठळक वैशिष्ट्ये आहे. प्रशासनात कागदाचा वापर करण्यात येत नाही. प्रशासनातील प्रत्येक संचिका कागदा शिवाय असते. प्रशासनातील माहिती, नोंदी, अभिलेख संगणकात सुरक्षित करून ठेवता येतात.

**2) पारदर्शकता-**

पारंपारिक प्रशासनात गोपनीयतेच्या या कायद्यानुसार महत्त्वाची गोपनीय माहिती ती गुप्त ठेवली जाते. प्रशासनात मात्र माहितीची अगदी सहजपणे देवाण-घेवाण होत असते. गोपनीयतेच्या कायद्याचे स्तोम प्रशासनात दिसत नाही. त्यामुळे अत्यंत महत्वाची माहिती गुप्त ठेवायची असेल तर ती संगणकात पारंपारिक प्रशासनाच्या तुलनेत अधिक सुरक्षितपणे गुप्त ठेवता येते.

**3) इलेक्ट्रॉनिक डाटा इंटरचेंज-**

ई--प्रशासन आत सर्व माहिती व आकडेवारी इलेक्ट्रॉनिक साधनाच्या सहाय्याने गोळा केली जाते. तिचे संकलन व विश्लेषण केले जाते.

**4) जन सहभागाला प्रोत्साहन-**

जन सहभागाशिवाय कोणतेही प्रशासन यशस्वी होऊ शकत नाही. ई- प्रशासनात मात्र प्रशासनातील जनसहभागाला मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन देण्यात येते. ई-प्रशासन लोक ऑनलाईन सहभागी होऊ शकतात.

**5) गतिमानता-**

ई-प्रशासनातील कार्य अतिशय जलद गतीने पूर्ण केले जातात. कार्य करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब केल्याने कार्याची गती वाढते म्हणून ई- प्रशासन गतिमान प्रशासन समजले जाते.

**6) अधिकार पद परंपरेचा अभाव-**

ई- प्रशासनात पदसोपान पद्धतीचा अवलंब केला जात नाही. प्रशासनात सत्ता व अधिकार समान अंतरावर असतात. आदेश देणे, नियंत्रण ठेवण्याची प्रक्रिया या प्रत्यक्षपणे संगणकाद्वारे पार पाडली जाते.

**7) तात्काळ उत्तरदायित्व-**

ई-प्रशासन हे तात्काळ उत्तरदायी असते आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे जनतेला सेवा प्रदान करीत असताना संगणकाच्या माध्यमातून तात्काळ उत्तरदायित्व ई- प्रशासनाचे उद्दिष्ट आहे.

**8) सतत सुधारणा-**

प्रशासनाच्या कार्यात सुलभता आणण्यासाठी यंत्रणेत सातत्याने सुधारणा करण्यावर ई- प्रशासनामध्ये हे मोठ्या प्रमाणामध्ये भर देण्यात येतो.

**9) उद्दिष्टभिमुखता-**

ई- प्रशासनाचे स्वरूप उद्दिष्टभिमुख आहे. ते निर्धारित उद्दिष्ट पूर्ण करण्यावर मोठ्या प्रमाणात भर देते.

**ई प्रशासनाचे फायदे**

1) ई-प्रशासनात भ्रष्टाचार कमी होतो. किंबहुना नसतो. कर, महसूल इत्यादीची वसुली प्रामाणिकपणे करता येते.
2) प्रशासनात संगणकाच्या माध्यमातून समन्वय प्रस्थापित करणे सुलभ जाते.
3) ई-प्रशासना मुळे नागरिकांचा वेळ, श्रम व पैसा यांचा अपव्यय टळतो.
4) ई-प्रशासना द्वारे प्रशासनात पारदर्शकता येते प्रशासनातील क्रिया-प्रक्रिया कार्यपद्धती सामान्य जनतेला कळण्यास मदत होते.
5) ई-प्रशासनात नागरिकांची सहजपणे संवाद साधला जातो. इंटरनेट, ई-मेल च्या माध्यमातून नागरिकांची प्रत्यक्ष संपर्क प्रस्थापित करता येतो.
6) ई प्रशासना मुळे अंतर ही बाब नसते कारण इलेक्ट्रॉनिक साधनाच्या सहाय्याने अतिशय दूरचे खेडे ही शहरातील कारल्याच्या दैनिक संपर्कात येते.
7) ई-प्रशासन विकसनशील देशात अधिक परिणामकारकपणे व विकसनशील समाजाला विकसित करण्यामध्ये मदत करते.

**ई-प्रशासन समोरील आव्हाने**

1) **संगणकाचा अनावश्यक वापर-** आज अनेक शासकीय कार्यालयामध्ये संगणकाचा वापर मोठ्या प्रमाणात केला जात आहे. वास्तविकता अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कागदाची साथ मात्र सोडलेली नाही. कारण अनेक कार्यात कागदाचा वापर आजही ही मोठ्या प्रमाणात होताना दिसून येतो. कार्यालयात उपलब्ध असलेल्या संगणकाचा वापर मात्र प्रिंट करण्यापलीकडे केला जात नाही.

**2) सायबर गुन्ह्यातील वाढ -** प्रशासनात संगणकाचा वापर मोठ्या प्रमाणात केला जात आहे मात्र याच बरोबर सायबर गुन्ह्यातही ही मोठ्या प्रमाणात वाढ होताना दिसून येते. सायबर गुन्हेगारांना प्रतिबंध करण्यासाठी पोलीस प्रशासनाचे अत्याधुनिकीकरण केले जावे. संगणक विशेषज्ञ यांना प्रशासनात नियुक्त केले जावे. ई प्रशासनाची स्थापना केली जावी ज्यामुळे न्यायिक गतिमानता येईल.

**3) प्रदर्शनात्मक स्वरूप -** भारतात उद्योग व वाणिज्य क्षेत्रात आय टी चा वापर मोठ्या प्रमाणात होत आहेत ज्या गतीने व्यापारात आयटीचा वापर होतो त्या गतीने प्रशासनात मात्र होत नाही ज्या शासकीय कार्यालयात संगणक व ई- साधने घेतली आहेत तेथे त्याचा प्रदर्शनापेक्षा अधिक उपयोग होत नाही.

**4) विसंगत वास्तव् -** भारत हे विकसनशील राष्ट्र आहे. भारतातील बहुतांशी लोक खेड्यात राहतात ग्रामीण भागात नागरी सुविधांचा अभाव आढळतो. रस्ते, वीज, पिण्याचे पाणी व वैद्यकीय सुविधा, बेकारी, अवर्षण, अतिवृष्टी ईत्यादी गंभीर प्रश्नांमुळे ग्रामीण समाज व प्रशासन त्रस्त आहेत. अशा देशात शहरी भागात संगणकाद्वारे प्रशासनाचे कार्य करता येते मात्र ग्रामीण भागात प्रशासनापुढे अनेक आव्हाने उभी आहेत.

**5) निरक्षरतेचे अधिक प्रमाण -** भारतात आजही निरक्षरतेचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे अशा समाजात ई-प्रशासन राबविणे अतिशय अवघड व धाडसाचे ठरेल. कारण प्रशासनाचा लाभ घेणारी जनता जर प्रशासनाबाबत अनभिज्ञ असेल तर प्रशासन आपले ध्येय प्राप्त करू शकत नाही.

**6) अधिकारी आणि पदाधिकारी यात उदासीनता-**

ई- प्रशासन यासाठी राजकीय पदाधिकाऱ्यां मध्ये इच्छाशक्ती व प्रशासकीय अधिकाऱ्यांमध्ये तत्परता असावी लागते. मात्र भारतात राजकीय पदाधिकारी व प्रशासकीय अधिकारी हे मोठ्या प्रमाणामध्ये उदासीन दिसून येतात.

**7) अ -प्रशिक्षित कर्मचारी -** प्रशासनात नियुक्त झालेले बहुसंख्य कर्मचारी संगणकाबाबत निरक्षर असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे ते संगणक हाताळू शकत नाही व इलेक्ट्रॉनिक साधनांच्या साहयाने कार्यही करू शकत नाही. कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करण्यासाठी संगणक प्रशिक्षणाचे कार्यक्रम हाती घेणे गरजेचे आहेत. त्याबाबतही मोठ्या प्रमाणात उदासीनता दिसून येते.

**निष्कर्ष**

1) प्रशासनाचे फायदे मोठ्या प्रमाणात असून ई- प्रशासन परिणामकारक रीत्या राबवले असता भारतातील जनतेचा विकास झाल्याशिवाय राहणार . त्यामुळे ई प्रशासनाचे महत्व भारतासारख्या विशाल काय देशासाठी गरजेचे आहेत.

2)आज ग्रामीण भागांमध्ये प्रशासनामुळे जनतेच्या अनेक अडचणी सोडवण्या मध्ये ई-प्रशासन उपयोगी ठरत आहेत.

3) ई- प्रशासन परिणाम कारक राबविणे गरजेचे आहे.

4) ई-प्रशासना मुळे भ्रष्टाचार कमी होण्यास मदत होत आहे.

5) ई प्रशासनामुळे भारतीय जनतेचे जीवनमान उंचावत आहे. ग्रामीण विकासाचा चेहरामोहरा बदलत चाललेला आहे.

**मूल्यमापन**

आजच्या विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात ई प्रशासनाचा मोठ्या प्रमाणात वापर होताना दिसून येतो. विकसित देश असो किंवा अविकसित देश असो अधिक प्रमाणात ई-प्रशासनाचा वापर ही वास्तव स्थिती आहे. भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये मोठ्या प्रमाणामध्ये ई-प्रशासन याचा वापर होऊ लागलेला असून या प्रशासनाचे अनेक फायदे भारतीय समाजाला मिळत आहे. असे असले तरी ई प्रशासनामध्ये येथील व्यवस्थेतील दोषांमुळे अनेक आव्हाने निर्माण झालेली आहेत. उदा. भारतामध्ये आजही ही निरक्षरतेचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहेत त्याच प्रमाणे ई-प्रशासन ज्या पद्धतीने कार्य झाले पाहिजे त्या पद्धतीने होत नाही. ग्रामीण भागामध्ये प्रशासनाचे फायदे मोठ्या प्रमाणात जनतेपर्यंत आजही पोहोचलेले दिसत नाही. मात्र प्रशासनाचा योग्य रीतीने आणि परिणामकारक वापर केल्यास भारतासारख्या मोठ्या लोकसंख्येच्या बहुसख्य समाज ग्रामीण भागामध्ये वास्तव्य करतो. अशा समाजाला ई-प्रशासन हे एक वरदानच आहे.

**संदर्भ :**

1) राजकुमार रिकामे, भारतीय प्रशासन, सक्सेस पब्लिकेशन, पुणे.
2) अरविंद कुलकर्णी, ई-प्रशासन, स्वयम् दीप प्रकाशन, पुणे.
3) व्ही बी पाटील, समग्र लोकप्रशासन , के सागर पब्लिकेशन पुणे.
4) विद्युत चक्रवती आणि प्रकाश चांद, जागतिकीकरणाच्या काळात लोकप्रशासन, शेज प्रकाशन, दिल्ली.
5) शुभांगी राठी, भारताचे प्रशासन आणि जिल्हा प्रशासन, अथर्व प्रकाशन, जळगाव.